नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०८/१०/२०२५ ( बुधवार )**

---

## अंमलीपदार्थ डोडा पावडर व डोडा चुरा बाळगुन विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, ८ किलो ५७६ ग्रॅम अंमली पदार्थ जप्त

**पोलीस स्टेशन बुटीबोरी** :— दिनांक ०७/१०/२०२५ रोजी अंमली पदार्थ विरोधी कारवाई पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदाराने खात्रीशीर माहीती दिली की, पोलीस स्टेशन बोरी हद्दीत चंद्रपुर ते बोरी रोडवरील समराथल राजस्थानी ढाबा येथे डोडा पावडर व डोडा चुरा या अंमली पदार्थाची विक्री केली जात आहे. मिळालेल्या महीतीच्या आधारे नमुद पथकाने बुटीबोरी पोलीसांसह घटनास्थळी जावुन समराथल राजस्थानी ढाब्याची झडती घेतली असता ८.५७६ किलोग्रॅम वजनाचे डोडा पावडर व चुरा हा अंमली पदार्थ मिळुन आला. तसेच सदर झडतीमध्ये पोलीसांना देशी दारू सुध्दा मिळुन आली. पोलीसांनी पंचासमक्ष ८.५७६ किलो ग्रॅम वाजनाचा ग्रॅम वजनाचे डोडा पावडर व चुरा अंमली पदार्थ किंमती १,६८,८२० /—रूपये ,देशी दारू, ॲड्रॉईड मोबाईल, रोख रक्कम,वजनकाटा किंमती ४१,८९० /—रूपये तसेच ईतर साहीत्य असा एकुण २,१०,७१० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

**नमुद प्रकरणी धाबा मालक आरोपी क्रं १. ब्रजराजसिंह रामेश्वरसिंह, वय. ३८ वर्षे ह.मु. न्यु समराथल राजस्थानी, धाबा ,रुईखैरी, ता. जि.नागपुर मुळपत्ता वार्ड क्र. ३ , जुने जैन मंदिर जवळ , फुप कला, ता.जि.भिंड ,मध्य प्रदेश आणि धाब्यावर कामाला असलेले आरोपी क्रं २.मनिष बुधाराम, वय. २३ वर्षे,ह.मु. न्यु समराथल राजस्थानी धाबा, रुईखैरी ता. जि.नागपुर, मुळपत्ता कुडी ,तह. पचपदरा, जिल्हा बालोत्रा, राज्य राजस्थान, आरोपी क्रं ३.रमेश राजुराम बिश्नोई, वय. ४३ वर्षे, ह.मु. न्यु समराथल राजस्थानी धाबा**

**, रुईखैरी, ता. जि.नागपुर मुळपत्ता बुधनगर ,जालेली दहीकडा, तह व जि. जोधपुर, राज्य राजस्थान यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन बुटीबोरी कलम ८(क), १५ (ब) , २२, २९ एन. डि.पि.एस. कायदा,सहकलम ६५ ई महाराष्ट्र दारू बंदी कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन नमुद आरोपीतांना दिनांक ११/१०/२०२५ रोजी पर्यंत पोलीस कोठडी रिमांड मंजुर झाला आहे.**



## अंमलीपदर्थाची विक्री करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद,आरोपी अटक मौदा पोलीसांची कारवाई

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक ०७/१०/२०२५ रोजी मौदा पोलीसांना गुप्त बातमीदाराने खात्रीशीर माहीती दिली की, भारत बोरकर हा गुमथाळा बस स्टॉप जवळील त्याच्या चहा टपरीत अंमली पदार्थ गांजा बाळगुन विक्री करत आहे. मिळालेल्या महीतीच्या आधारे पोलीसांनी घटनास्थळी जावुन सापळा रचुन अरोपी नामे **भारत किसन बोरकर ,वय ५५ वर्षे रा. गुमथाळा, ता.कामठी, जि. नागपुर** याला ताब्यात घेतले आणि नमुद आरोपीचे चहा

टपरीची झडती घेतली असता लहान मोठया प्लास्टीक पन्नीत गांजा सदृश अंमली पदार्थ मिळुन आला. पोलीसांनी आरोपीच्या ताब्यातुन पंचासमक्ष २१६ ग्रॅम गांजा किंमती २,१६० /— रूपये , रोख रक्कम १४६०/— रूपये आणि एक ॲड्रॉईड मोबाईल असा एकुण किंमती १३,६२०/—रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आला आहे.

आरोपी नामे भारत किसन बोरकर ,वय ५५ वर्षे रा. गुमथाळा, ता.कामठी, जि. नागपुर याच्या विरूध्द एन. डी. पी. एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे.

## अल्पवयीन बालीकेवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. जलालखेडा** :— फिर्यादीयांच्या तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जलालखेडा येथे अप क्र. २३८/२३ कलम ३४२,४५२,३७६(एबी), भादंवि सहकलम ४,६ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, दिनांक १९/०६/२०२२ रोजी यातील फिर्यादी आणि तिची मोठी मुलगी शेतावर कामासाठी गेले होते त्यावेळी फिर्यादीची अल्पवयीन मुलगी, वय १० वर्षे ही एकटीच घरी असतांना आरोपी **नामे सचिन रामराव घोरपडे, वय ३५ वर्षे, रा. महेंद्री ता. नरखेड, जि. नागपुर** याने अल्पवयीन पिडीतेला पाणी मागितले. पिडीता पाणी आणण्यसाठी घरात गेली असता आरोपीने घरात घुसुन अल्पवयीन पिडीतेवर लैंगिक अत्याचार केला.

श्री मनोज शेंडे, पोलीस निरीक्षक, नेमणुक. पोलीस स्टेशन जलालखेडा यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. आज दिंनाक ०८/१०/२०२५ रोजी मा. अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायधीश श्री आर.पी पांडे , विशेष न्यायालय यांनी नमुद आरोपी नामे सचिन रामराव घोरपडे, वय ३५वर्षे रा. महेंद्री ता. नरखेड, जि. नागपुर यास **कलम ४५२ भादंवि मध्ये १ वर्षे सश्रम कारावास व १०००/—रू दंड, दंड न भरल्यास ३ महीने सश्रम कारावास २) कलम ८ पोक्सो मध्ये ०३ वर्षे सश्रम कारावास व ५,०००/रू दंड,दंड न भरल्यास ०६ महिने सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली आहे.**

सरकारचे वतीने एपीपी श्याम खुळे आणि एपीपी श्रीमती असावरी परसोडकर यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन पोलीस पोलीस हवलदार रविंद्र कांबळे, प ब.नं २३५०, पोलीस स्टेशन जलालखेडा यांनी मदत केली आहे.

## गंभीर जखमी करून खुन करणारे दोन अज्ञात आरोपी १२ तासात निष्पन्न बुटीबोरी पोलसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन बुटीबोरी :—** पोलीस स्टेशन बुटीबोरी येथे फिर्यादी नामे मंगेश व्यंकटराव झोडे, वय ४४ वर्षे,रा. देवळी (गुजर) ता जि नागपूर यांनी फिर्यादी दिली की, फिर्यादीचा लहान भाउ योगेश व्यंकटराव झोडे हा बोलेरो पिकअप गाडीने मजूरांना सोडून दि. ३०/०९/२०२५ रोजी सायंकाळी ०५.३० वा. दरम्यान घरी परत येत असताना मौजा कोलार येथे रोडवर मुख्य चौकात अनोळखी दोन इसमांनी अज्ञात कारणावरून त्याला रस्त्यात अडवून त्याला जिवानिशी मारण्याचे उद्देशाने त्याचे छातीवर बसून हाताबुक्क्यांनी व कोणत्यातरी साधनाने मारहाण करून गंभीर जखमी केले आहे. अशा फिर्यादीच्या तक्रार वरून पोलीस स्टेशन बुटीबोरी येथे अज्ञात आरोपीता विरूध्द कलम १०९, ३(५) भा.न्या.सं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. नमुद जखमी हा उपचारा दरम्याण आज दिनांक ०८/१०/२०२५ रोजी मरण पावल्याने सदर गुन्हयात कलम १०३ (१) भा.न्या.सं अन्वये कलम वाढ करण्यात आली आहे.

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्रीमती भाग्यश्री धिरबस्सी उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर उपविभाग यांच्या मार्गदर्शनात बुटीबोरी पोलीसांनी सदर गुन्हयाचा तपास तात्काळ सुरू करत तांत्रिक पुराव्या आधारे अवघ्या १२ तसात आरोपी नामे **१) आदित्य विरेंद्र बेले, वय २८ वर्षे रा. सम्यक बुध्द विहार, दसरा रोड महाल, नागपुर आणि २) हिमांशु रमेशचंद्र गुप्ता , वय २१ वर्षे रा. न्यु कळमना,गणेश नगर, नागपुर यांना निष्पन्न करून त्यांना नागपुर येथुन ताब्यात घेवुन विचारपुस केली असता घटनेदिवशी मृतक याच्या गाडीचा आरोपीच्या गाडीला कट लागल्याने त्यांच्यात बाचाबाची झाल्याने आरोपीतांनी मृतक योगेश व्यंकटराव झोडे, वय ३३ वर्षे, यास मारहाण करून गंभीर जखमी केल्याची माहीती प्राप्त झाली. आरोपीने मृतकास गंभीर जखमी केल्याने मृतक मयत झाला. नमुद गुन्हयात दोन्ही**

**आरोपीला अटक केली असुन दिनांक १०/१०/२०२५ पर्यंत आरोपीचा पोलीस कोठडी रिमांड मंजुर झाला आहे.**

## अवैध शस्त्र बाळगणाऱ्या अरोपीविरूध्द गुन्हा नोंद
## कोंढाळी पोलीसांची कामगिरी

**पो.स्टे. कोंढाळी :—** दिनांक ०७/१०/२०२५ रोजी कोंढाळी पोलीसांना ११२ कॉलद्वारे माहीती मिळली की, धनकुंड गावात काही इसम एका कार मधुन आले आहे व त्यांचे जवळ शस्त्र आहेत. मिळालेल्या माहीताच्या आधारे कोंढाळी पोलीस तात्काळ धनकुंड येथे पोहचले व बसस्टॉप जवळ उभ्या असलेल्या पांढऱ्या रंगाच्या स्विफ्ट कार क्रमांक एम.एच. ३० सी. एस. ५३८० मधील इसमांची चौकशी करण्याकरीता कार जवळ गेले असता कार चालक आरोपी नामे नागेश भाउराव नेहारे, वय २३ वर्ष पळुन गेला परंतु आरोपी नामे पंकज ज्ञानेश्वर ठाकरे, वय ३३ वर्ष, रा. कातलाबोडी आणि एका विधीसंघर्ष बालकाला पोलसांनी शिताफिने ताब्यात घेतले आणि चौकशी करून कार ची पंचासमक्ष तपासणी केली असता एक लोखंडी तलवार व एक गुप्ती मिळुन आली. पोलीसांनी नमुद आरोपीला शस्त्र बाळगण्याच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याचे कडे परवाना नसल्याची माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष १) एक लोखंडी तलवार आणि २) एक गुप्ती असा मुद्देमाल जप्त केला आहे.

**नमुद आरोपी यांच्या विरूद्ध पोस्टे कोंढाळी येथे कलम ४,२५ शस्त्र अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.**

## रात्र गस्त दरम्यान कोबींग ऑपरेशन राबवुन केले रेकॉर्डवरील गुन्हेगार तपासले आणि नाकाबंदी करून तपासली वाहने

दिनांक ०७/१०/२०२५ चे २३:०० वा. ते दिनांक ०८/१०/२०२५ चे ०५:०० वा. दरम्यान जिल्हा गस्त मध्ये श्रीमती भाग्यश्री धिरबस्सी उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर उपविभाग यांनी संपुर्ण जिल्हयात सतर्कपणे गस्त केली. पोलीस स्टेशन बोरी अंतर्गत पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले आणि एम.आय. डी.सी. चौक येथे नाकाबंदी केली. पोलीस स्टेशन एम.आय.डी.सी बोरी अंतर्गत गंगापुर झोपडपट्टी येथे पायदळ पेट्रोलींग करून कोबींग ऑपरेशन राबविण्यात आले आणि गार्डन चौक येथे नाकाबंदी केली. नाकाबंदी दरम्यान ५७ वाहने तपासण्यात आली. सदर कोबिंग ऑपरेशन श्रीमती भाग्यश्री धिरबस्सी यांच्या नेतृत्वात राबविण्यात आले असुन रेकॉर्डवरील गुन्हेगार, जेल रिलीज गुन्हेगार, निगराणी बदमाश तसेच अवैध दारू विक्रेते गुन्हेगार चेक करून त्यांचे घराची पंचासमक्ष घरझडती घेण्यात आली. नाकाबंदी दरम्यान संशयीत वाहनांची तपासणी करण्यात आली. सदर कारवाईमध्ये स्थानिक पोलीस स्टेशन चे अधिकारी/अंमलदार हजर होते.





मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने